सदरक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
**पोलीस विभाग**
वार्ताहर कक्ष,
पोलीस आयुक्त, यांचे कार्यालय,
डॉ. डी. एन. रोड, मुंबई-४००००१.

दूरध्वनी क्र. २२६२०३३२
Email I.D. – pressroom.mum@mahapolice.gov.in

---

जा.क्र. ६४१ /वार्ता.कक्ष/२०२१ दिनांक :- १६/१२/२०२१

# —: प्रेस नोट :—

## —:साकीनाका पोलीस ठाणे, पोलीस अंमलदार श्री राजेंद्र राठोड यांची अभिमानास्पद कामगिरी:—

पश्चिम प्रादेशिक विभाग, मुंबई अंतर्गत परिमंडळ १० मधील साकीनाका पोलीस ठाणेचे पोलीस शिपाई क्रमांक ०८०४२३/श्री राजेंद्र राठोड हे दिनांक १४/१२/२०२१ रोजी बिट चौकी कर्तव्यावर होते. सायंकाळच्यावेळी एक व्यक्ती त्यांचेजवळ आले. त्यावेळी त्यांना खूप घाम येवून अस्वस्थ वाटत होते तसेच त्यांच्या छातीतसुध्दा दुखत होते.

क्षणाचाही विलंब न करता परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पोलीस शिपाई श्री राजेंद्र राठोड यांनी तात्काळ त्यांना जवळच्या हॉस्पिटलमध्ये नेऊन वैदयकीय उपचार करविला. त्यामुळे सदर इसमाचे जिवीतास कोणताही धोका झाला नाही. त्यामूळे त्यांनी पोलीस शिपाई क्रमांक ०८०४२३/राजेंद्र राठोड यांचे व मुंबई पोलीस दलाचे निस्वार्थीपणे केलेल्या मदतीचे आभार मानले.

(चैतन्या एस्.) 16/12/21
पोलीस उप आयुक्त (अभियान),
जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय, मंबई

Scanned with CamScanner